वाशिम जिल्हा पोलीस दल
Visit us
Website: www.washimpolice.gov.in

प्रेस नोट 11/21

दिनांक :- 06/12/2021

**पो.स्टे.रिसोड येथील विनयभंगाचे गुन्ह्यातील आरोपीस कारावास व दंडाची शिक्षा.**

मा.पोलीस अधिक्षक,श्री.बच्चन सिंह यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारल्या पासून पोलीस दलातील कामांना गती मिळाली आहे. तसेच बेकायदेशीर कृत्य करणारांवर वचक निर्माण व्हावा याकरीता कोर्टात चालणारे खटल्यातील पिडीतांना न्याय मिळावा व आरोपीतांना शासन व्हावे यादृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरु आहेत.

ग्राम-एकलासपुर, रिसोड येथे दि.०८.०५.२०१९ रोजी घडलेल्या घटनेचा फिर्यादी हिने रिपोर्ट दिला की, नमुद गुन्ह्यातील आरोपी रवि आशोक गवळी वय-३२ वर्ष, रा.एकलासपुर, रिसोड याने रात्रीचे वेळी अंधाराचा फायदा घेऊन फिर्यादीचे घराचे गच्चीवर जाऊन फिर्यादी हिचे तोंड दाबून छाती दाबून तिचा विनयभंग केला व तिला म्हटले की, कोणाला सांगू नको नाहीतर तुला जिवाने मारुन टाकीन अशी धमकी दिली. असता फियांदी हिने आरडा-ओरड केली तेंव्हा आरोपी हा तेथून पळून गेला. अशा फियांदी हिचे रिपोर्ट वरुन पो.स्टे.रिसोड येथे अपराध क्र.२०३/१९ कलम-३५४, ३५४(अ), ३०४ भादंवि. सहकलम-८ POCSO प्रमाणे गुन्हा दाखल झाले वरुन गुन्ह्याचा तपास पुर्ण होऊन मा.जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम येथे गुन्ह्याचा न्यायनिवाडा होणे करीता खटला सुरु होता.

दि.०४.१२.२०२१ रोजी मा.न्यायालयाने नमुद खटला क्र. Spl Child २६/२०२० चा न्यायनिवाडा करतांना आरोपी नामे-रवि अशोक गवळी वय-३२ वर्ष रा.एकलासपुर, रिसोड यास **विदयमान प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्रीमती शैलजा सावंत यांनी** कलम-३५४ भादंवि. प्रमाणे २ वर्ष सश्रम कारावास व नगदी १०००/- रुपये दंड, कलम-३५४(अ) भादंवि. प्रमाणे १ वर्ष कारावास व नगदी ५००/- रुपये दंड, तसेच कलम-५०४ भादंवि प्रमाणे १ वर्ष कारावास व नगदी ५००/- रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर गुन्ह्यात सरकारचे वतीने सर.अभियोक्ता म्हणून अॅड.श्री.व्यवहारे यांनी काम पाहीले आहे त्या दरम्यान त्यांनी ६ साक्षिदार तपासुन गुन्हयातील पिडीतेस न्याय मिळवुन देण्यास मदत केली.

नमुद गुन्ह्याचा तपास-सहा.पोलीस निरीक्षक-सोनाली गुल्हाणे, यांनी केला असून त्यांना सहाय्यक म्हणून पो.कॉ.संतोष इढोळे यांनी काम पाहीले आहे. तसेच सदरचे खटल्यात कोर्ट पैरवी म्हणून नापोकॉ./१९० अमरसिंग ठाकूर पो.स्टे.रिसोड यांनी वेळोवेळी पाटपुरावा केला आहे.

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम